# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३७६/२०२३ दिनांक – २५/१०/२०२३

## वाहन चोरी करणाऱ्या ३ आरोपींना अटक करुन एकुण १२ गुन्हांची उकल वालीव पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी.

वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील फिर्यादी नामे गुल्फराझ नासिर आलम, वय २६ वर्षे, व्यवसाय - स्क्रिन प्रिंटीग, रा. रूम नं. १०३ सायरा अपार्टमेंट, फणसपाडा, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांची होंन्डा ॲक्टीवा ६जी मोटार साकयल क्रमांक एम.एच. ४८ सी.जी. ६३७३ ही त्यांचे घरासमोर उघडयावर पार्कीग केलेली असताना दिनांक १४/१०/२०२३ रोजी रात्री ०२.०० वा. ते सकाळी ०७.०० वा. चे दरम्यान कोणी तरी अज्ञात चोरटयाने त्याचे संमती शिवाय, लबाडीने, उघडयावरुन चोरी केली म्हणून वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ८१२/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि. या प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वसई-विरार परीसरात मोटार वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ यांनी वाहन चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत आदेश दिल्याने श्री. विनायक नरळे, सहाय्यक उप आयुक्त, तुळींज विभाग व श्री. जयराज रणवरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शन व सुचनानुसार वालीव पोलीस ठाणेचे स.पो.नि. सचिन सानप व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी सिसिटीव्ही फुटेजच्या आधारे विरार पुर्व, राजीवली, वसई कोळीवाडा येथुन आरोपी नामे १) शमशुददीन अब्दुल रज्जाक शेख, वय २८ वर्ष, व्यवसाय- नोकरी, रा. गणेश चाळ, रुम नं. २, डांबर प्लांट, गणपती मंदीराजवळ, राजीवली, नायगाव पुर्व, जि. पालघर २) फिरोज अब्दुल रज्जाक शेख, वय ३१ वर्ष, धंदा- बफींगकाम, रा. रुम नं. २०३, मंदा रिसॉर्ट चाळ, रामु कम्पाऊंड, चंदनसार, विरार पुर्व, जि.पालघर व ३) मुस्ताक मुन्ना शेख ऊर्फ शोयब टरकी, वय ३० वर्ष, व्यवसाय- रिक्षा चालक, रा. रुम नं, २१२, इकरा अपार्टमेंन्ट, डांगेवाडी, अकबर राईस मिल जवळ, नालासोपरा पश्चिम, जि. पालघर यांना शिताफीने पकडुन त्यांच्याकडुन चोरी केलेल्या ८ मोटार सायकल व ४ ऑटो रिक्षा असे एकुण अं.रु. ५,२६,०००/- किंमतीची १२ वाहने जप्त करण्यात आले इकडील आयुक्तालयातील १० व ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील १ व मुंबई पोलीस आयुक्तालयातील १ असुन एकुण १२ गुन्हे उघड केले आहेत.

**-उघडकीस आलेले गुन्हे-**

| अ.क्र. | गु.र.क्र.व कलम | पोलीस ठाणे |
|---|---|---|
| १ | गु.र.क्र. ८१२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | वालीव पोलीस ठाणे |
| २ | गु.र.क्र. ८१५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | वालीव पोलीस ठाणे |
| ३ | गु.र.क्र. ८२६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | वालीव पोलीस ठाणे |
| ४ | गु.र.क्र. ८२८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | वालीव पोलीस ठाणे |
| ५ | गु.र.क्र. ९०८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | पेल्हार पोलीस ठाणे |
| ६ | गु.र.क्र. ३९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | विरार पोलीस ठाणे |
| ७ | गु.र.क्र. ५६२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | विरार पोलीस ठाणे |
| ८ | गु.र.क्र. ५३०/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | काश्मीरा पोलीस ठाणे |

| | | |
|---|---|---|
| ९ | गु.र.क्र. १३८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | माणिकपुर पोलीस ठाणे |
| १० | गु.र.क्र. ७५६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | तुळींज पोलीस ठाणे |
| ११ | गु.र.क्र. ११९१/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | मुंब्रा पोलीस ठाणे, ठाणे शहर |
| १२ | गु.र.क्र. ५९९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | मालाड पोलीस ठाणे, मुंबई शहर |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

**----0000----**